वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- गुरूवार दि.६ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# जमिन घोटाळा प्रकरणी पार्थ पवार अडचणीत

## पुणे तहसिलदारांसह दुय्यम उपनिबंधक तडकाफडकी निलंबित

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कारवाई, १८०० कोटींची जमिन ३०० कोटींना खरेदी

Email.- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com



### नुसते आरोप प्रत्यारोप करुन चालणार नाही. मीडिया ट्रायल करु नये. पार्थ माझ्या मुलासारखा आहे. तो कधीच गैरव्यवहार करणार नाही. माझा पार्थवर विश्वास आहे-खा.सुप्रिया सुळे

पुणे , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाला आहे. पार्थ पवार यांच्या मालकीच्या कंपनीने पुण्यातील कोरेगाव पार्क येथील ४० एकर सरकारी जमीन अत्यंत कमी किमतीत खरेदी केल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या व्यवहारात तब्बल २५ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली असून, केवळ ५०० रुपये स्टॅम्प ड्युटी भरून हा व्यवहार पूर्ण झाला आहे. व्यवहारानंतर अवघ्या दोन दिवसांत स्टॅम्प ड्युटी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या प्रकरणाची फाईल इतक्या वेगाने कशी फिरली, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं असून सत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारवर चहुबाजूने टीका होऊ लागलेली असतानाच राज्य सरकारकडून पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांचं निलंबन करण्यात आलं आहे. पार्थ पवार जमीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवरच येवले यांचं निलंबन झाल्याचं बोललं जात आहे. मात्र निलंबनाबाबतचे कोणतेही पत्रक माझ्याकडे अद्याप आले नसल्याचा दावा तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जमीन व्यवहार प्रकरणात अनियमितता आढळून आल्याने पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांना निलंबित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे समजते. तसंच याप्रकरणी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत.

पार्थ पवार हे अमेडिया होल्डिंग्स एलएलपी या कंपनीचे संचालक आहेत. या कंपनीत त्यांचे मामेभाऊ आणि आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांचे चुलत बंधू दिग्विजय पाटील ▶▶ पान २ वर

### पार्थला कोणी फसवलंय का ?खा.सुप्रिया सुळेंचा संशय



मुंबई , (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्यावर एका जमिनीच्या खरेदी व्यवहाराप्रकरणी गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांमुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. उबाठा गटाचे नेते अंबादास दानवे यांनी एक्सवरून पोस्ट शेअर करत पार्थ पवार यांच्या अमेडिया होल्डिंग्स एलएलपी कंपनीने १८०० कोटी रुपये बाजारभाव असलेली जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत विकत घेतल्याचा गंभीर आरोप केला आहे.फुले शाहू आंबेडकर यांचे नाव घ्यायचे आणि

# जनसेवेसाठी तत्पर; भारत काळे हे पुन्हा जिल्हा परिषद सदस्य होणार

## हक्काचा माणूस म्हणून नेकनूर सर्कलमध्ये केली ओळख निर्माण

नेकनूर, (दिव्य न्युज):- नेकनूर सर्कलमध्ये विकासाची ओळख निर्माण करणारे माजी जिल्हा परिषद सदस्य भारत काळे पुन्हा एकदा जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. रस्ते, स्मशानभूमी, पाण्याच्या योजना आणि विविध सार्वजनिक कामांद्वारे त्यांनी हक्काचा माणूस ही प्रतिमा निर्माण केली असून, या कामांच्या बळावर मतदार त्यांना पुन्हा संधी देतील, असे बोलले जात आहे. गेल्या कार्यकाळात कोट्यवधींची कामे मार्गी लावल्यानंतर उर्वरित विकास कामांचा अनुशेष भरून काढण्यासाठी ते पुन्हा जनता दरबारात जाणार आहेत.



मायबाप जनतेच्या आशीर्वादाने सुरु केलेला विकासाचा यज्ञ पूर्ण करणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

बीड तालुक्यातील नेकनुर येथील भुमिपुत्र तथा माजी जिल्हा परिषद सदस्य दुसऱ्यांदा नेकनुर जिल्हा परिषद गटातुन निवडणुकीच्या मैदानात उतरत आहेत. नेकनूर जिल्हा परिषद गटाचा सर्वांगीण विकास करण्याचे ध्येय घेऊन, माजी जिल्हा परिषद सदस्य भारत काळे यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. आजपर्यंत मायबाप जनता जनार्दन आणि मतदारांच्या आशीर्वादावर त्यांनी विकासाचा जो 'यज्ञ' सुरू केला आहे, तो ▶▶ पान २ वर

# दुसऱ्यांना अक्कल शिकवणाऱ्या इंदुरीकर महाराजांकडून लेकीच्या साखरपुड्यावर लाखोंची उधळपट्टी

## डबेवाला संघटनेच्या अध्यक्षांचा घणाघात

मुंबई , (दिव्य न्युज):- आपल्या नर्मविनोदी आणि थेट शैलीतून समाजातील विविध प्रश्नांवर प्रबोधन करणारे प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर हे सध्या त्यांच्या कन्येच्या साखरपुड्याच्या सोहळ्यामुळे चर्चेत आले आहेत. ज्ञानेश्वरी आणि साहिल यांचा साखरपुडा नुकताच संगमनेर येथील वसंत लॉन्स येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. या सोहळ्याचे व्हिडिओ आणि छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रचंड व्हायरल होत असून, यावरून समाजातील विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत.या पार्श्वभूमीवर मुंबई डबेवाला संघटनेचे अध्यक्ष ▶▶ पान २ वर



# नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ

## ७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्याचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांचे आवाहन

बीड , (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास शहरातील कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह दिसून येत आहे. कार्यकर्त्यांच्या वाढत्या प्रतिसादाचा विचार करून पक्षाच्या उच्चस्तरीय निर्देशानुसार अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. आता इच्छुकांना ७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी दिली.



अमर नाईकवाडे म्हणाले, नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल केले जात आहेत. पूर्वनिर्धारित अंतिम मुदत ५ नोव्हेंबर होती. मात्र, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच वरिष्ठ नेत्यांच्या ▶▶ पान २ वर

# सुरेश धस यांनी रान उठविलेल्या कृषि घोटाळ्याचा पर्दाफाश होणार

## चौकशीत धडाकेबाज आयएएस अधिकाऱ्याची एन्ट्री

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्याच्या कृषि विभागातील कथित भ्रष्टाचाराबाबत भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या तक्रारीनंतर काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारने निवृत्त सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांची विशेष चौकशी समिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, धस यांनी त्यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेतला होता. त्यानुसार आता धस यांच्या मनासारखे झाले असून एका ख-ड अधिकाऱ्यावर चौकशीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राज्य सरकारने दांगट यांची नियुक्ती करताना एक महिन्यांत कृषी आयुक्तांकडे चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. विशेष चौकशी अधिकारी म्हणून २४ जून रोजी




त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पण धस यांनी महिनाभरातच त्यांच्याऐवजी डॉ. प्रवीण गेडाम यांची नियुक्ती करण्याची मागणी सरकारकडे केली होती.धस यांच्या मागणीवर सरकारने आतापर्यंत कोणताही निर्णय घेतला नव्हता. पण आता एका आयएएस अधिकाऱ्यांकडे ही चौकशी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दांगट यांनीच चौकशी अधिकारी म्हणून केलेली नेमणूक रद्द करण्याची विनंती सरकारकडे केली होती. त्यांनी १४ ऑगस्ट रोजीच ▶▶ पान २ वर

# प्रभाग क्रं. ६ मधून डॉ.तहुरा रफिक बागवान निवडणूक लढणार

## रफिक बागवान हे ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेनचे प्रदेश उपाध्यक्ष

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील प्रभाग क्रं. ६ जुना बाजार, हत्तीखाना, चुन गल्ली, बडी राज गल्ली आणि इतर परिसर या प्रभागात येत असून या प्रभागात मोठा जनसंपर्क आणि मोठ्या प्रमाणात मित्र परिवार व मानणारा मोठा वर्ग असल्याने प्रभाग क्रं. ६ मधून डॉ.तहुरा रफिक बागवान हे निवडणूक लढविणार आहेत. रफिक बागवान हे मागील अनेक वर्षापासून ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेनचे जिल्हाध्यक्ष म्हणुन काम करत होते. नुकतेच त्यांना राज्य कार्यकारणीत स्थान देण्यात आले आणि त्यांना प्रदेश उपाध्यक्ष करण्यात आले आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक ओबीसी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रासह इतर सोयी सुविधा त्यांनी मिळवून दिलेल्या आहेत. अत्यंत मनमिळावू आणि



प्रत्येकांच्या सुख दुखात नेहमी पुढे असणारे आणि समाजसेवेची जाण असणारे एक खरे समाजसेवक म्हणुन त्यांनी ओळख आहे. प्रत्येकांशी असलेले मैत्रीपुर्ण संबंध आणि प्रभागात असलेला दांडगा जनसंपर्क या बळावर डॉ.तहुरा रफिक बागवान ह्या निवडणूक लढण्यासाठी सज्जा झाल्या असुन येणाऱ्या दोन ते तीन दिवसात आपला उमेदवारी अर्ज हजारो समर्थकांच्या उपस्थितीत भरणार असल्याची माहिती आहे. त्यांच्या या निवडणूकीत उतरण्याच्या निर्णयामुळे अनेक विरोधी उमेदवारांना आता पासूनच घाम फुटायला सुरूवात झाली आहे. रफिक बागवान यांची या निवडणुकीत एकतर्फी विजय होईल असे काहीसे वातावरण या प्रभागात दिसून येत आहे.

# प्रभाग क्रं. १६ मधून हिना कौसर शेख युनूस निवडणूकीच्या रिंगणात

## शेख युनूस यांचा मोठा दांडगा जनसंपर्क आणि जवळच्या संबंधामुळे निवडणुकीत येईल यश



बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील प्रभाग क्रं. १६ मधून माजी नगरसेवक शेख युनूस यांच्या पत्नी हिना कौसर शेख युनूस ह्या प्रभाग क्रं. १६ मधून निवडणूकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून त्यांना उमेदवाराळी मिळणार असल्याची माहिती आहे. शेख युनूस हे याच प्रभागातून नगरसेवक म्हणुन निवडून आले होते. त्यांच्या कार्यकाळात या प्रभागात अनेक कामे झालेली आहेत जी आजही मतदारांच्या आठवणीत आहेत.

शेख युनूस यांना मानणारा मोठा वर्ग या प्रभागात असून मोठ्या प्रमाणात मित्र परिवार ही आहे. त्यांच्या या निवडणूकीत उतरल्याने इतर उमेदवारांचे धाबे दणाणले आहेत. त्यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता असून त्यांना उमेदवारी मिळाल्यास त्यांचा विजय एकतर्फी होईल. येणाऱ्या काही दिवसात त्यांच्या उमेदवारीवर शिक्मोर्तब होईल आणि दोन ते तीन दिवसात ते आपला उमेदवारी अर्ज भरणार असल्याचीही माहिती आहे.

# बीड नगर परिषद निवडणुकीसाठी इच्छुकांनी अर्ज भरावेत

## आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन, ६ तारखेस फॉर्म भरणे ७ अन् ८ तारखेला मुलाखती



**बीड ,(दिव्य न्युज):- नगरपरिषद निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी दि.६ नोव्हेंबर रोजी, इच्छुक उमेदवारी अर्ज भरून घ्यावेत असे आवाहन आ. संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ. सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्याकडून करण्यात आले आहे.**

दरम्यान नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती ७ नोव्हेंबर आणि ८ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी भवन, बीड यथे होणार आहेत. २०२२ मध्ये कार्यकाळ संपुष्टात आलेल्या बीड नगरपरिषदेच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. दि.१० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज भरण्यात येणार असून २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. आणि लगेचच ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे. निवडणूक आयोगाकडून हे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बीड शहरातील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक उमेदवारांसाठी अर्ज आणि मुलाखतीचे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे. त्यामुळे बीड शहरातील उमेदवारांनी पक्षाकडून विहित केलेले शुल्क भरून अर्ज घेण्याचे आवाहन आ. संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ. सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. दरम्यान विहित मुदतीच्या नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नसल्याचेही पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

असे आहे इच्छुक उमेदवारांसाठी पक्षाकडील वेळापत्रक

दि.६ नोव्हेंबर २०२५ - राष्ट्रवादी भवन, बीड येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत आपला इच्छूक उमेदवारी अर्ज भरून जमा करणे. दि. ७ नोव्हेंबर - प्रभाग क्रमांक. २, ३, ४, ५, ६, ७, १९, २०, २१, २२, २३,२४, २६ या प्रभागांतून नगरसेवक उमेदवारांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दि. ८ नोव्हेंबर - प्रभाग क्रमांक. १, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, २५ या प्रभागांतून नगरसेवक उमेदवारांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती ७ नोव्हेंबर व ८ नोव्हेंबर या दोन्ही दिवशी नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती होतील.

पान १ वरून

## एआयएमआयएमच्य

साबा झफर यांना ५२,५१५ मतांच्या फरकाने पराभूत करून (९४,४५९ मते मिळवून) ही जागा जिंकली होती.त्या निवडणुकीत एआयएमआयएमने सीमांचल पट्टीतील पाच जागा जिंकल्या होत्या, ज्यात अमौरचा समावेश होता. आता २०२५ च्या निवडणुकीतही पक्ष हा मतदारसंघ कायम ठेवण्यासाठी आक्रमक रणनीती आखत आहे, ज्यात जनसुराज पक्षाच्या अफरोज आणि काँग्रेसच्या अब्दुल जलील मस्तान यांच्याशी चार कोपऱ्यांची लढत अपेक्षित आहे.
महाराष्ट्रातून या प्रचारयंत्रणेचा एक प्रमुख चेहरा आहे बीड जिल्ह्यातील 'बीडचा भाऊ' म्हणून ओळखले जाणारे नेते. ते २०२१ मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारात सहभागी झाले होते आणि पक्षाच्या यशात मोलाची भूमिका बजावली होती. त्या वेळी एआयएमआयएमने पाच आमदार निवडून आणले, ज्यात ईमान यांचा समावेश होता. भाऊंनी दिलेल्या जबाबदाऱ्यांनुसार, यावेळीही ते बिहारसोबतच तेलंगणा, गुजरात आणि दिल्लीतील पक्षाच्या प्रचार मोहिमांमध्येही सक्रिय असतील. सीमांचलच्या मुस्लिम समाजाच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी एआयएमआयएमची लढाई कायम आहे. महाराष्ट्रातून आम्ही पूर्ण ताकदीने साथ देत आहोत, असे भाऊ म्हणाले. प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर यांनी सांगितले, राष्ट्रीय अध्यक्षांच्या दृष्टिकोनानुसार, आम्ही स्थानिक मुद्द्यांवर - जसे पूरप्रवण भाग, शिक्षण आणि आरोग्य - लक्ष केंद्रित करत आहोत. इम्तियाज जलील साहेबांच्या नेतृत्वात महाराष्ट्र एकजुटीने बिहारच्या या लढ्यात सहभागी आहे. तर फेरोज लाला यांनी मराठवाडा विभागातून २०१९ पासून पक्षाच्या विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, ते आता बिहारमधील प्रचारातही प्रमुख भूमिका बजावणार आहेत.
एआयएमआयएमने बिहारमध्ये मुस्लिम मतदारांच्या असंतोषाचा फायदा घेत २०२० मध्ये यश मिळवले होते. आता २०२५ मध्येही पक्ष 'मुस्लिम कार्ड' आणि स्थानिक मुद्द्यांवर जोर देऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे निवडणूक आयोगानुसार, अमौर मतदारसंघात सुमारे ६०% मुस्लिम मतदार आहेत, जे ही लढत निर्णायक बनवू शकतात.
या प्रचार मोहिमेमुळे एआयएमआयएमची राष्ट्रीय विस्ताराची रणनीती अधिक स्पष्ट झाली असून, बिहार विधानसभा निवडणुकीत (७ आणि ११ नोव्हेंबरला मतदान, १४ नोव्हेंबरला निकाल) पक्षाची भूमिका काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जिंतूर पोलीसांनी

रामा अत्माराम घोगरे वय२१ वर्ष रा खोलगाडगा ता जिंतूर व २) योगेश शेकुराव गायकवाड वय १८ रा खोलगाडगा ता जिंतूर यांना अटक करून गुन्हयात गेलेला मुद्देमाल आरोपीकडून जप्त केला.
सदरची कार्यवाही मा पोलीस अधिक्षक श्री रविद्रसिंह परदेशी, व अप्पर पोलीस अधिक्षक श्री सुरज गुंजाळ, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री जिवन बेनिवाल, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्ष श्री गजेंद्र सरोदे, यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री पुंड व सुनिल राठोड, गणेश कौटकर सायबर सेल , धोत्रे यांनी केली.

## समाजवादी पक्ष करिता

आठ नोव्हेंबर पर्यंत सादर करावे हे इच्छुक उमेदवारी अर्ज जिल्हा अध्यक्ष यांचे समक्ष सादर होऊन लवकरात लवकर निर्णय घेतले जाणार असून समाजवादी पक्षाचे निवडणूक चिन्हावर निवडणूक लढविण्याचे इच्छुकांनी आठ नोव्हेंबर पर्यंत आपापले कार्यक्षेत्रातील पदाधिकाऱ्यांशी संपर्क करून उमेदवारी अर्ज भरून ८ नोव्हेंबर पर्यंत सादर करावे हे अर्ज जिल्हा ठिकाणी नऊ नोव्हेंबर पर्यंत सादर करण्याची सूचना प्रत्येक नगरपरिषद कार्यक्षेत्र ठिकाणचे पदी अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे इच्छुक उमेदवारी अर्ज साठी नाममात्र शुल्क आकारण्यात आले असून नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुकांनी लवकरात लवकर आपले अर्ज सादर करण्याचे आवाहन समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरूल इमान खान यांनी केले असून त्यांच्याशी९८२२७९७८४६ संपर्क केला जाऊ शकते

पान १ वरून

## पार्थला कोणी फसवलंय

महार वतनाच्या जमिनी खिशात घालायच्या हा अजित दादांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी केली आहे. या आरोपांवर सुप्रिया सुळे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. नुसते आरोप प्रत्यारोप करुन चालणार नाही. मीडिया ट्रायल करु नये. पार्थ माझ्या मुलासारखा आहे. तो कधीच गैरव्यवहार करणार नाही. माझा पार्थवर विश्वास आहे, अशी प्रतिक्रिया सुळे यांनी दिली आहे.
पुढे त्या म्हणाल्या, कादगपत्र व्यवस्थित तपासायला हवी, ही सरकारची जमीन असेल तर असं कसं असेल? जमीनीचा व्यवहार कसा होईल? असा सवाल त्यांनी उपस्थित केला असून पार्थला कोणी फसवलंय का? असा संशयही सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला आहे. मी काही कागदपत्र पाहिले नाहीत. आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा काय व्यवहार आहे हे तपासावं, अशी मागणी त्यांनी केली आहे. मला त्या व्यवहाराबद्दल काही माहिती नाही. घाईघाईने बोलण्यापेक्षा मी पार्थशी बोलेन असेही त्या म्हणाल्या.
३०० कोटींची जमीन घेण्यासाठी पैसा कुठून येतो? या प्रश्नावर मी माहिती घेते आणि उत्तर देते, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. मला रेवती, विजय आहेत तसे रोहित, पार्थ ही सर्व मुले आमचीच आहेत. लोकशाहीत आरोप करण्याचा अधिकार तुम्हाला आहे पण पार्थची बाजू जाणून घेऊया, असे म्हणत त्यांनी पार्थ पवार यांच्यावर होणाऱ्या आरोपांवर मत मांडले.
२२ एप्रिल २०२५ रोजी अमेडिया कंपनीने आयटी पार्क उभारण्याचा ठराव केला. आश्चर्य म्हणजे अवघ्या ४८ तासात उद्योग संचालनालयाने या प्रकल्पावरील स्टॅम्प ड्युटीही माफ करून टाकली, असा आरोप दानवे यांनी केला आहे. तसेच उद्योग संचालनालयाने कोणत्याही अनुभवाशिवाय असा प्रस्ताव देणाऱ्या कंपनीचे प्रपोजल स्वीकारून कोणत्या नियमात स्टॅम्प ड्युटी माफ केली? यावर कळस म्हणजे २७ दिवसात हा सर्व व्यवहार जिकडे-तिकडे झाला आणि या ४० एकर जमिनीच्या व्यवहारासाठी लागलेली स्टॅम्प ड्युटी आहे फक्त रुपये ५००! असा अत्यंत गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

## जमिन घोटाळा

हे भागीदार आहेत. या दोघांनी मिळून ही सरकारी जमीन खरेदी केली आहे. सरकारी नियमांना बगल देऊन ही जमीन खरेदी करण्यात आल्याचा आरोप आहे. या संपूर्ण प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, २५ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली. केवळ ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरून हा व्यवहार पूर्ण झाला. विशेष म्हणजे, जमीन खरेदीचा व्यवहार झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच स्टॅम्प ड्युटी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे या व्यवहाराची फाईल इतक्या वेगाने कशी पुढे सरकली, यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.
दरम्यान, पुण्यातील अतिउच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरात ही ४० एकर सरकारी जमीन आहे. सर्व सरकारी नियम धाब्यावर बसवून ही जमीन खरेदी करण्यात आल्याचा आरोप केला जात असून या प्रकरणामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर विरोधकांनी जोरदार टीका केली आहे.दरम्यान, तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली असून पार्थ पवार यांच्याशी संबंधित प्रकरणामुळेच सरकारने तडकाफडकी त्यांचे निलंबन केल्याची चर्चा रंगत आहे.
१८०० कोटींची जमीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवारांच्या कंपनीने केवळ ३०० कोटींमध्ये घेतली तसंच यासाठी स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रूपये मोजल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. यानंतर पुण्याचे तहसीलदार सूर्यकांत येवले यांचं तडकाफडकी निलंबन करण्यात आलं आहे.
पुणे पार्थ पवार जमिन घोटाळा प्रकरण तहसीलदार सूर्यकांत येवले आणि हवेली क्रमांक-३ चे दुय्यम उपनिबंधक रविंद्र तारु यांना निलंबित करण्यात आलं आहे. अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेत चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत निर्देश दिले आहेत. मात्र आपण व्यवहार केलाच नाही, अशी प्रतिक्रिया निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवलेंनी दिली. तसंच निलंबनाचा आदेशही आपल्याला मिळाला नसल्याचं येवलेंनी सांगितलं.
माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. मी व्यवहार केलेला नाही, त्याबद्दल मला माहिती नाही. आमच्याकडून परवानगी दिली गेली नाही. महार वतनाची जमीन होती, तो काय व्यवहार झाला, दुय्यम निबंधकासोबत व्यवहार झालाय, त्याबद्दल मला माहिती नाही. निलंबनाचा मलाच अजून तो आदेश मिळालेला नाही. माझ्याकडे ती फाईल आलीच नाही, आमच्याकडून परवानगी दिली नाही, असं पुण्याचे निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले म्हणाले.
व्यवहार झालाय, दस्त झालाय तो सब रेजिस्टर संदर्भातील आहे. माझ्याकडून परवानगी दिली नाही, प्रस्तावीत केलं नाही. माझ्यावर केलेल्या कारवाईचे पत्र अजून मिळालं नाही, म्हणून बोलता येणार नाही. आदेश प्राप्त झालं नाही म्हणून बळीचा बकरा बनवलं का सांगता येणार नाही. आदेश प्राप्त झाल्याशिवाय मी बोलू शकत नाही. माझ्याकडे कुणीही माहिती मागवली नाही, काल तर सुट्टी होती. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी मला माझ्याकडे माहिती मागवली नाही. मी अजून दस्तच पाहिला नाही, म्हणून मी व्यवहार गैर म्हणू शकत नाही. माझ्याकडे ते कागदच आले नाहीत. माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असं पुण्याचे निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी स्पष्ट केलं.
सदर प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता या प्रकरणाच्या संदर्भात मी सर्व माहिती मागवलेली आहे. महसूल विभाग, आयजीआर, लँड रेकॉर्ड संदर्भातील सर्व माहिती मी मागवली आहे. या संदर्भातील योग्य ते चौकशीचे आदेश देखील मी दिलेले आहेत, असं म्हणाले. तसेच प्राथमिक चौकशीच्या आधारावर मी यासंदर्भात मी पुढे बोलेल. अद्याप माझ्याकडे पूर्ण माहिती आलेली नाही. प्राथमिक स्तरावर जे मुद्दे समोर येत आहेत ते मुद्दे गंभीर आहेत. त्यामुळे त्यावर योग्य प्रकारची माहिती घेऊनच बोलले पाहिजे. आज माझ्याकडे या संदर्भात माहिती येणार आहे. ती माहिती आल्यानंतर मी शासनाची पुढची दिशा काय? या प्रकरणात काय कारवाई होणार? या सर्व गोष्टी सांगितल्या जातील, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केले.
१८०० कोटींची जमीन पार्थ पवारांच्या कंपनीने केवळ ३०० कोटींमध्ये घेतली तसंच यासाठी स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रूपये मोजल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादस दानवे यांनी केला. महत्वाचं म्हणजे पार्थ पवारांनी कोरेगाव पार्कात आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारीही चालवली, एक लाखाचे भांडवल असलेल्या कंपनीला हे कसे काय शक्य होते, असा सवाल अंबादास दानवेंनी उपस्थित केलाय. या व्यवहारासाठी उद्योग संचालनालयाने ४८ तासात स्टॅम्प ड्युटीही माफ केली, तर केवळ २७ दिवसांत हा व्यवहार झाला असं अंबादास दानवे म्हणाले.

## सुरेश धस यांनी

तसेच पत्र दिले होते.
अखेर राज्य सरकारने दांगट यांची विनंती मान्य केली असून त्यांच्याऐवजी विशेष चौकशी अधिकारी म्हणून यशदाचे महासंचालक निरंजन कुमार सुधांशू यांची नियुक्ती केली आहे. कृषि विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी बेकायदेशीरपणे सुरू केलेल्या कृषि निविष्ठा व उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्रे याबाबत सुरेश धस यांच्या तक्रारी त्याचप्रमाणे विविध योजनांमधील गैरव्यवहारांबाबत प्राप्त गंभीर तक्रारींची चौकशी निरंजन कुमार सुधांशू करतील.सर्व चौकशी प्रकरणातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना विशेष चौकशी अधिकारी चौकशीसाठी बोलावू शकतात. चौकशीसाठी बोलावण्यात आलेल्यांनी चौकशीस उपस्थित राहणे तसेच, विशेष चौकशी अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करून देणे बंधनकार राहील, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

## नगरपरिषद निवडणुकीसाठी

सूचनेनुसार ही मुदत दोन दिवसांनी वाढवून ७ नोव्हेंबर करण्यात आली आहे.उमेदवारी अर्ज राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा कार्यालय, मित्र नगर, बीड येथे उपलब्ध असून, हे अर्ज कार्यालयीन सरचिटणीस महादेव धांडे यांच्याकडे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जमा करायचे आहेत. अमर नाईकवाडे यांनी सर्व इच्छुक कार्यकर्त्यांना वेळेवर अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले असून, निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मजबूत संघटित पद्धतीने उतरविण्यासाठी पक्षाची तयारी सुरू असल्याचेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

## जनसेवेसाठी तत्पर

पूर्णत्वास नेण्याचा त्यांचा निर्धार आहे. विशेषतः श्री गुरु बंकट स्वामी यांच्या पावनभूमीत राहिलेला विकासाचा अनुशेष पुढील काळात पूर्णपणे भरून काढणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.
नेतृत्वाचा मोठा आधार मिळाल्याने नेकनूर सर्कलमध्ये विकासाची गंगा
भारत काळे यांनी आपल्या कामाची दिशा स्पष्ट करताना, त्यांना मिळालेल्या नेतृत्वाचा उल्लेख केला. महाराष्ट्र राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे आणि बीड जिल्ह्याच्या माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या माध्यमातून त्यांना नेहमीच पाठबळ मिळाले आहे. यासोबतच, केज-अंबाजोगाई मतदार संघाच्या कार्यकुशल आमदार नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्वात, तसेच बीड जिल्ह्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर जिल्हा परिषद गटात विकासाची 'गंगा' आणण्यात आली. अनेक महत्त्वपूर्ण कामे मार्गी लागली आहेत. तसेच श्री गुरु बंकटस्वामीच्या पावनभूमीसह गटात काही विकासकामे वेगाने होण्याची गरज असल्याचे काळे यांनी सांगितले.
नेकनूरच्या विकासासाठी निवडणूक लढणार अन् जिंकणार - भारत काळे
नेकनूर गटातील विकासाचा राहिलेला प्रत्येक अनुशेष भरून काढण्यासाठीच मी ही निवडणूक लढवण्याचा आणि जिंकण्याचा निर्धार केला आहे. जनतेने आतापर्यंत ज्याप्रमाणे आशीर्वाद दिला, त्याचप्रमाणे मतदानरुपी आशीर्वाद देऊन मला जिल्हा परिषदेच्या सभागृहात पाठवतील, असा माझा प्रगढ विश्वास आहे. भारत काळे यांनी व्यक्त केलेला हा विश्वास आणि विकासाची तळमळ पाहता, नेकनूर जिल्हा परिषद गटातील जनता त्यांना नक्कीच निवडून देणार असल्याचे बोलले जात आहे.

## दुसऱ्यांना अक्कल

सुभाष तळेकर यांनी इंदुरीकर महाराजांवर तीव्र टीका केली आहे. दुसऱ्यांना अक्कल शिकवणारे इंदुरीकर महाराज आपल्या मुलीच्या साखरपुड्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करतात, असे तळेकर यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले.तळेकर पुढे म्हणाले, इंदुरीकर महाराज कीर्तनातून लोकांना नेहमी सांगतात की मुलांची लग्नं व साखरपुडे साध्या पद्धतीने करा, कर्ज काढू नका, अनाठायी खर्च टाळा. पण त्यांनी स्वतःच जर अशा थाटामाटात साखरपुडा केला, तर ते समाजासमोर चुकीचा संदेश देणारे आहे. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' या म्हणीप्रमाणे वागले असते, तर त्यांनी खऱ्या अर्थाने आदर्श निर्माण केला असता.
जर साखरपुड्यातच एवढा खर्च झाला असेल, तर लग्नसमारंभात नक्कीच करोडो रुपयांची उधळपट्टी होईल. समाजाला कीर्तनातून उपदेश करताना आपण एक बोलता परंतु त्याचा जीवनात अवलंब करत नाही, याचा खेद वारकरी सांप्रदायाला आहे. निवृत्ती महाराज जसे उपदेश करतात तसे जर वागले असते तर सांप्रदायाला नक्कीच अभिमान वाटला असता, असेही सुभाष तळेकर म्हणाले.अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील मूळ रहिवासी असलेले कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर देशमुख हे गेल्या दोन दशकांपासून कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य करत आहेत. समाजातील वाईट रूढी-परंपरा, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, तसेच युवकांमधील गुन्हेगारी वृत्तीवर ते नेहमीच प्रखर शब्दांत प्रहार करतात. त्यांच्या कीर्तनांतील विनोदी शैली आणि थेट भाष्य यामुळे ते महाराष्ट्रभर लोकप्रिय आहेत. तथापि, त्यांच्या काही विधानांवरून वेळोवेळी वाद उद्भवले असून, यावेळी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील सोहळ्यामुळे पुन्हा एकदा ते चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.